# शिवचरित्र म्हणजे एक जीवंत आणि तेजस्वी इतिहास आहे: श्रीमती यु.यु.पाटील




**श्रीपतराव चौगुले कॉलेजमध्ये शिवजयंतीनिमित्त निमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन इतिहास विभाग प्रमुख श्रीमती यु. यु. पाटील सोबत श्री. शिवाजीराव पाटील, डॉ.बी.एन.रावण, डॉ. एम. के.कांबळे, श्री. यु. एन. लाड, डॉ. उषा पवार**

श्रीपतराव चौगुले आर्टस ॲण्ड सायन्स कॉलेज, माळवाडी -कोतोली, ता. पन्हाळा येथील इतिहास विभाग व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शिवजयंती निमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन इतिहास विभाग प्रमुख श्रीमती यु.यु.पाटील यांच्या हस्ते करण्यात आले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव श्री. शिवाजीराव पाटील होते.

शिवचरित्र म्हणजे एक जीवंत आणि तेजस्वी इतिहास आहे आणि विशेष म्हणजे तो याच महाराष्ट्रात घडला आहे जीजाऊ आऊसाहेबानी लहानपणापासून शिवबाना सुसंस्काराचे व युध्दकलेचे धडे दिले शिवबानी आपल्या बाल सवंगडयासह हिंदवी स्वराज्याची स्थापना केली आणि अनेक संकटाना सामोरे जात स्वराज्याचा विस्तार करून रयतेला यवनांच्या जाचातून मुक्त केले छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार, आचार आजच्या पिढीने आत्मसात करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन इतिहास विभाग प्रमुख श्रीमती यु. यु. पाटील यानी केले. श्रीपतराव चौगुले आर्टस ॲण्ड सायन्स कॉलेज, माळवाडी -कोतोली, ता. पन्हाळा येथील इतिहास विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शिवजयंती निमित्त आयोजित केलेल्या व्याख्यान प्रसंगी श्रीमती पाटील बोलत होत्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र. प्राचार्य डॉ.बी.एन. रावण होते. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन संस्थेचे सचिव श्री. शिवाजीराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास ज्यु. विभाग प्रमुख डॉ. उषा पवार,राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख डॉ.एम.के.कांबळे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.एन.डी. मांगोरे, श्री.यु.एन. लाड, श्री.पी. डी. माने, सर्व शिक्षक , शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत डॉ.एम.के.कांबळे यानी केले आभार श्री.एम. वाय. पोवार . यानी मानले तर सुत्रसंचलन श्री.डी.एच. नाईक यानी केले.